# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/04/2023 (सोमवार) सकाळ

---

## घरफोडी

१) पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत ०.५ कि.मी. अंतरावरील तहसिल कार्यालय पारशिवनी येथे दिनांक २२/०४/२०२३ ते दिनांक २३/०४/२०२३ चे २०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. दिक्षा नागेश्वर डोंगरे, वय ३२ वर्ष रा. प्रभाग क्र. १२ पारशिवनी यांचे नमुद ठिकाणी चहा नाश्त्याचे दुकानाचे ठेल्याचे कुलुप तोडून आत ठेवलेले एक एच पी कंपनीचे १९ किलोचे गैस सिलेंडर किंमती अंदाजे २०००/— रू. एक बर्नल असलेली गॅस शेगडी किंमती अंदाजे ३००/— रू., पाण्याची बॉटल ठेवण्याची थरमाकॉलची पेटी किंमती अंदाजे १०००/— रू. असा एकुण ३३००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गजानन उके बोंद्रे मो. नं. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा महाजन ले आउट सावनेर येथे दिनांक २२/०४/२०२३ रोजीचे १६/०० वा. ते दि. २३/०४/२०२३ चे सकाळी १०/३० वा. सुमारास फिर्यादी नामे— श्री. प्रशांत अरुणराव डहाके, वय ४४ वर्ष, रा. वार्ड क्र. ८ महाजन ले आउट सावनेर, मुळ रा. खुरजगाव याचे राहते घराचे दाराचे लॉक तोडुन घरात प्रवेश करुन घरातील आलमारी फोडुन सोन्याचांदीचे दागिने व नगदी असे १) ५३,०००/— रुपये किंमतीचे १८ कॅरेट सोन्याचे ८ डायमंड असलेले मंगळसुत्र त्यात सोन्याचे पदक असलेला वजनी २० ग्रॅम जुने वापरते २) १८,०००/—रुपये किमंतीचे १८ कॅरेट सोन्याचे ६ डायमंड असलेली वजनी ४ ग्रॅम सोन्याची अंगठी जुनी वापरती ३) ९,०००/—रुपये २४ कॅरेट सोन्याची वजनी ३ ग्रॅम सोन्याची अंगठी वापरती ४) ३०,०००/— रुपये किंमतीचे चांदीचे भांडे, ताट, लक्ष्मीची मुर्ती ग्लास, वाटी, चमचा, ९ चांदीचे सिक्के कुंकवाचा करंडा असा एकुण ७८१ ग्रॅम जुनी वापरती ५) पिगी बॅग मध्ये ठेवलेले नगदी अंदाजे १७०००/—रुपये ६) आलमारीचे लॉकर मध्ये ठेवलेले नगदी १,०८,०००/—रुपये असा एकुण २,३५,०००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी शिवाजी नागवे पोस्टे सावनेर मो. नं. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर